Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

INTERNATIONAL E-RESEARCH JOURNAL

PEER REFREED & INDEXED JOURNAL
January - 2019 Special Issue – 84

# बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी कविता




अतिथी संपादक :
**डॉ. आर.बी. ढेरे**
प्राचार्य,
शंकरराव भेलके महाविद्यालय,
नसरापूर, ता. भोर, जि. पुणे

विशेषांक संपादक :
**डॉ. जगदीश शेवते**
मराठी विभाग प्रमुख,
शंकरराव भेलके महाविद्यालय,
नसरापूर, ता. भोर, जि. पुणे

विशेषांक सहसंपादक :
**प्रा. संदीप सांडभोर**
मराठी विभाग,
शंकरराव भेलके महाविद्यालय,
नसरापूर, ता. भोर, जि. पुणे

मुख्य संपादक :
डॉ. धनराज धनगर (येवला)

This Journal is indexed in :
- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

ISSN : 2348-7143
January-2019

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFEREED & INDEXED JOURNAL

January-2019 Special Issue – 84

## बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी कविता

अतिथी संपादक
डॉ. आर. बी. डेरे
शंकरराव भेलके महाविद्यालय, नसरापूर
ता. भोर, जि. पुणे

विशेषांक संपादक : डॉ. जगदीश शेवते (नसरापूर)
विशेषांक सहसंपादक : प्रा. संदीप सांडगे (नसरापूर)
मुख्य संपादक : डॉ. धनराज धनगर (येवला)

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 800/-

Published by –
© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik
Email : swatidhanrajs@gmail.com Website : www.researchjourney.net Mobile : 9665398258

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 84 : बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी कविता | January-2019
UGC Approved Journal

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | लेखक/लेखिका | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| 1 | बदलत्या सांस्कृतिक पर्यावरणातील जागतिकीकरण व मराठी कवितेतील वास्तव | डॉ. बाळकृष्ण लळीत | 03 |
| 2 | डॉ.अरुणा ढेरे आणि सौ कल्पना दुधाळ यांच्या कवितेतील सांस्कृतिक परिप्रेक्ष्याचे विश्लेषण | डॉ.मधुकर मोकाशी | 09 |
| 3 | दलित कवयित्रींच्या कवितेतील सांस्कृतिक पर्यावरण | डॉ.रामलीला पवार | 12 |
| 4 | गोमंतकातील सांस्कृतिक स्थित्यंतरे आणि मराठी कविता | प्रा.विनय मडगावकर | 19 |
| 5 | बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि ग्रामीण कविता | प्रा.विजय जाधव | 25 |
| 6 | सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी कविता | डॉ.सुनील शिंदे | 29 |
| 7 | मुंबई महानगरीय कवितांमधील विश्व | डॉ.प्रतिभा थाम | 34 |
| 8 | सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी कविता सहसंबंध | डॉ.सौ.मंगल डोंबरे | 40 |
| 9 | भुईशास्त्र या काव्य संग्रहातील सांस्कृतिक पर्यावरण | प्रा.संदीप लांडगे | 43 |
| 10 | सांस्कृतिक पर्यावरण आणि स्त्रीवादी कविता | डॉ.गीता बवस-पेलेंकर | 46 |
| 11 | सांस्कृतिक पर्यावरण आणि आदिवासी कविता | प्रा.एम. एम. बागुल | 56 |
| 12 | विडंबन काव्याचे उत्तम दर्शन – झेंडूची फुले | डॉ.जगदीश शेवते | 61 |
| 13 | राजन गवस यांच्या कवितेतील पर्यावरणीय संदर्भ | डॉ.विजय वाजपरे | 64 |
| 14 | स्त्रियांच्या स्त्रीवादी कवितेतील स्त्री संबंधित जीवनवास्तव | सरिता सोमाणी | 73 |
| 15 | सांस्कृतिक पर्यावरण आणि दलित कविता (Abstract ) | डॉ.अतुल चौरे | 79 |
| 16 | मराठी कवितेची पर्यावरणवादी समीक्षा | डॉ. भरत जाधव | 81 |


*या अंकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी राखून ठेवलेले आहेत. प्रकाशक, संपादक यांच्या पूर्वपरवानगीशिवाय या अंकाचे किंवा त्यातील लेखांचे पुनर्प्रकाशन करता येणार नाही. संपादित विशेषांकातील लेखसंशोधन निबंधातून व्यक्त झालेली मते ही त्या लेखांच्या लेखकांची वैयक्तिक मते आहेत त्यांच्याशी संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. लेखांच्या मूळ मालकी हक्कासंदर्भात (कॉपी राईट) सर्व जबाबदारी संबंधित लेखकांची आहे.*

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 84 : बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी कविता
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

# सांस्कृतिक पर्यावरण आणि आदिवासी कविता

प्रा. बागुल एम. एन
अण्णासाहेब वाघीरे महाविद्यालय ओतूर
ता. जुन्नर. जि. पुणे
मो. ९८६०४१८९०
ई-मेल - mnbagual2012@gamil.com

माणसाचा पहिला परिचय हे काव्यातूनच होत असतो. आदिमानवांनी पहिल्या भावना व विचार व्यक्त केल्या असतील त्या गाऊन आणि नाचून केल्या असतील. अगदी बालपणात बाळ जेव्हा झोळीत किंवा पाळण्यात झोपलेला असतो, आई गाणे म्हणत असते तेव्हा आईच्या मुखातून ऐकलेले गाणे हे माणसाच्या जीवनातील अनुभवलेल्या कवितेचा पहिला अविष्कार असतो. नुसते गाणे म्हणजे कविता नव्हे, पद्य म्हणजे कविता नव्हे तर ताल, लय, नाद, छंद, रस, गुण, अलंकार, रूपक, प्रतिमा हे कवितेचे मुलभूत घटक आहेत. काव्य म्हणजे कवीच्या व्यक्तिमत्वाचा सहज अविष्कार असतो.

प्राचीनकाळी संतसाहित्याची पहाट उदयास आली आणि ती पारलौकिक जीवनाचे भक्तीचे गोडवे गाण्यातच गुंग झाली. त्यानंतर मध्ययुगाच्या कालखंडात पंडिती वाङ्मय, शाहीरी वाङ्मय, बखर वाङ्मय या साहित्याच्या माध्यमातून शृंगार, प्रेम, विरह-मीलन यातच आपली प्रतिभा अवघी वाया घालविली. या कालखंडातील साहित्यिकांनी आदिवासी साहित्याला स्पर्श ही केला नाही. ही फार खेदाची गोष्ट आहे. १९७९ साली चंद्रपूर जिल्ह्यात भद्रावती येथे आदिवासी साहित्यिकांचे पहिले संमेलन भरले व या निमित्ताने मराठी साहित्यामध्ये आदिवासी साहित्याचे नवे दालन उघडले गेले. आदिवासी पहिले संमेलनाच्या उद्घाटकीय भाषणामध्ये डॉ. यशवंत मनोहर यांनी 'आदिवासी हे या भूमीचे अधिपुत्र आहेत. आपला देश अनेक जखमांनी जर्जर झालेला आहे. आदिवासी ही अशीच एक जखम आहे. ही जखम आता चिघळू लागली आहे. त्यातूनच आदिवासी साहित्य जन्माला येत आहे. स्वतःच्या गुलामगिरीची जाणीव गुलामांना करून द्यावी लागते. म्हणजे ते या गुलामीच्या बेड्या तोडून टाकण्यासाठी प्रवृत्त होतील असे विचार व्यक्त केले. म्हणून आदिवासींचे यानंतरचे जे साहित्य निर्माण होईल ते अर्थाने मराठी पेटवणारे साहित्य असेल. दलित साहित्यातून आदिवासी वजा नाही आणि आदिवासी साहित्य दलित वजा नाही. हे झाले पाहिजे असे झाले तर एकूणच आपले एकूण साहित्य क्रांतिकारक होईल. त्याच प्रमाणे समाजही क्रांतिकारक होईल' असे विचार डॉ. यशवंत मनोहर यांनी प्रतिपादन केले.

आज आदिवासी नवशिक्षितांचा नवीन वर्ग मोठ्या संख्येने आदिवासी साहित्य लिहू आणि बोलू लागला आहे आणि मराठी साहित्यामध्ये आदिवासी साहित्य आपले स्थान निर्माण करू लागला आहे. आदिवासी कवी हा आपल्या जीवनानुभव आपल्या काव्यातून प्रभावीपणे मांडू लागला आहे. काही आदिवासी कवींनी आपल्या भावना आणि विचार खालील काव्यसंग्रहातून व्यक्त केले आहेत.

महाराष्ट्रातील आदिवासींचा पहिला प्रातिनिधीक काव्यसंग्रह 'मोहोळ' हा सन १९८२ साली धुळे येथे भरलेल्या दुसऱ्या साहित्य संमेलनात प्रसिद्ध झाला. ज्येष्ठ कवी भुजंग मेश्राम व प्रभू राजगडकर यांनी तो संपादित केला आहे. त्यानंतरच्या काही कविता संग्रह खालील प्रमाणे: - वेदा-फुकार अर्थात पहाडी फुल- भाग-१ व -२, सुखदेव बापू उईके (१९९२), आदिवासी कविता- भुजंग मेश्राम (१९७५), वनवासी -दत्तात्रय धोंगडे (१९८४), गोंधड- वाहरू सोनवणे (१९८७), इंडियन पेटले आहे- डॉ. विनायक तुमराम (१९८७), उलगुलान- भुजंग मेश्राम (१९९०), प्रतिभारण्य -रवी कुलसंगे (१९९०), अनुर्दे- पुरुषोत्तम शेडमाके, जागवा मने पेटवा मशाली- प्रा. वामन शेळमाके (१९९१),

चिक्कार- रामचंद्र जंगले (१९९७),मोरक्की- उषाकिरण आत्राम (१९९७), मनोगत- प्रा माधव सरकुंडे (१९९७), अनुभूती- डॉ.गोविंद गारे (१९९४), पनुला- कृष्णकुमार चांदेकर (१९९९), रानआवळ्याचे तळे सौ. कुसुम आलाम (१९९८), मुक्तमुक्त- वसंत कनाके (२००२), तीरकामठा- सुनील कुमरे (१९९९), पावरी- बाबाराव मडावी (२००२), वहीवाट- तुकाराम धांडे (२००७), पानझडी- डॉ.संजय लोहकरे (२०११), रानफुलांच्या कविता- संपा डॉ.संजय लोहकार (२०१४), झडप- देवदत्त चौधरी (२०१४), आगाज- विनोद कुमरे (२०१४)

कविता ही मानवी जीवनावर परिणाम करते परंतु हा परिणाम केवळ आनंदाचा नसतो तर तो जीवनविषयक जाणिवांमध्ये भर टाकणारा असतो कविता मनाला जागृत करते, जगण्याची उमेद आणि खोल समज आपणास मिळते वरील आदिवासी कवितासंग्रहातून आदिवासी माणसाचा वास्तव दर्शन घडते. आदिवासी वाङ्मयाच्या विकासातही काव्यनिर्मितीला महत्वाचे स्थान आहे. आदिवासी कविता म्हणजे जीवनानुभूतींचा आविष्कार होय. आदिम संवेदनेतून ती निर्माण झालेली दिसते. आदिम संवेदना व्यक्त करणारी ही कविता म्हणजे आदिवासी कविता होय. आदिवासी कवितेत येणारे विषय म्हणजे जीवन, निसर्ग, संस्कृती, इतिहास, दुःख, दारिद्र्य हे त्यांच्या कवितेचे विषय आहेत. काही कवितांचा परिचय पुढील प्रमाणे-'ठणक'. या कवितामध्ये प्रा.माधवराव सरकुंडे यांनी सभोवतालच्या पर्यावरणाचा आदिवासींचे सामान्य जीवन आपल्या कवितातून व्यक्त केले आहे. परिस्थिती व्यवस्थेचे बळी ठरलेला हा आदिवासी माणूस आपल्या कवितातून आपली भावना व्यक्त करतात.

'काळाने माणसाला इतके नग्न करावे
की प्राण्यानेच प्रश्न विचारावे
युगांच्या युगं कलून पडली तरी
दगडालाच सत्याचं उपेक्षेचे जगणे'

या कवितातून शतकानुशतके या अनुभूतीने आदिवासी उपेक्षित ठेवल्याची खंत व्यक्त केली आहे. आदिवासींच्या विकासाची वाट इतकी खाचखळग्यांनी भरली आहे असा प्रश्न कवीला पडतो. आदिवासी समाज हा जंगलात एखाद्या लहानश्या पाड्यावर झोपडी करून राहतो. नैसर्गिक दैनंदिन जीवनात ते निसर्गाशी समरस झालेले आहेत. आदिवासी स्त्री ही जंगलात प्रसूत होते आणि जन्मलेल्या बाळाचे भविष्य ही आई वडिलांप्रमाणेच जगण्याचे संस्कार आपल्या मुलाबाळांवर आपोआप होत असतो. निसर्गात जगण्यासाठी गलोर, बाण, धिकाटी, फासे इत्यादी शिकारीचे हत्यारे वापरण्यास शिकविले. निसर्गातील फळ व फुलं खाऊन कधी कधी आनंदात जीवन जगत असतो.

पोटाच्या भुकेसाठी मोहफुल वेचायची
मोहाचे घाटा आणि मीठाचे खडा
खाऊन गटागटा प्यायचा पाण्याचा घडा..

आदिवासी समाज आपली भूक भागविण्यासाठी मोहाच्या झाडाचे फुले आणि फळ (टोळंब) हे वेचण्यासाठी जंगलात जातात विंचू साप यांची भिती कधीच वाटत नाही. याचे वास्तव दर्शन आपल्या कवितेतून व्यक्त केली आहेत. आदिवासी कवी डॉ.गोविंद गारे यांचे 'अनुभूती' या कवितासंग्रहात एकूण २१ कवितांचा समावेश असून त्यामध्ये मूक रहिवासी आदिवासी, ती माणसंच होती, त्यांना भेटले तेव्हा, बापड्याचा निरोप, वारल्यांचा सहवासात या वारल्या काव्यसंग्रहातून आदिवासींच्या भावना, जिव्हाळा, प्रेम, दुःख आदिवासींच्या सामान्य जीवन आणि शोषण त्यांच्या गोष्टी बोली भाषेतून आदिवासी जीवन उलगडून दाखविले आहे. 'ती माणसंच होती' ही कविता पुढील प्रमाणे.

"कळाकळपाने काळनेमी
काटकळुटाच अंगाची
तेलकट काळ्यारंगाची

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013) | January-2019
Special Issue 84 : बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी कविता
UGC Approved Journal

नागडी उघडी बोडकी
करपलेल्या सुकया देह-यष्टी
पोट खपाटीला गेलेली
कवटीत डोळे अडकलेली
डोक्यावर मडकी गाडगी
अंगरख्यावर ठिगळी ठिगळी
धडपडत जगावयाला निघालेली
ती माणसं होती."

आदिवासी हा मूळ रहीवासी असून सुध्दा आज भारताला स्वातंत्र्य मिळून ७० वर्ष झाली तरी आदिवासी जमातीतील मुलं नागडी, उघडी, बोडकी आणि कुपोषित बालकांची अवस्था आजही बिकट झाली आहे. 'जीवन-सापळा' या कवितेतून आदिवासींची अवस्था कशाप्रकारची यथातथ्याने केली आहे.

वर्षानुवर्षे हजारो वर्षे
जीवन मरणाचा शोधीत अर्थ
डोंगर-दऱ्यातून,रानावनातून
झाडाझुडपातून , काट्याकुट्यातून
थंडी आणि ऊन्हा-तानातून
एकमायेची वाट शोधीत
ते करीत आहेत वस्ती
पिढीन् पिढ्या पोटात घालून
[illegible] दिवे निवारा करून
कसे तरी कुठेतरी... जगत आहेत.

हजारो वर्षांपासून आदिवासी जीवन जगण्याचा आणि मरणाचा अर्थ डोंगर-दऱ्यातून शोधत आहेत. आलेल्या परिस्थितीला सामोरे जात आहेत परंतु विजय केवळी त्यांचा आहे. प्रा. गोविंद गारे म्हणतात आदिवासींच्या सुधारणेसाठी शिक्षणाचा प्रसार वाढला पाहिजे. केवळ त्यामुळेच त्यांची दृष्टी व्यापक व प्रगत होईल. गर्भावस्थेतल्या मनासारखे ज्ञान घेऊन समाज घटकांमध्ये दुष्ट स्पर्धा आणि महत्वकांक्षा निर्माण होऊन आदिवासींच्या प्रगतीला गती असे विचार व्यक्त केले आहे.

कवी- वाहरू सोनवणे आदिवासी साहित्य चळवळीतील एक कवी म्हणून महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान ,मध्यप्रदेश या राज्यातही कवी म्हणून प्रसिध्द आहेत. विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे ते उपाध्यक्ष आहेत. कवी वाहरू सोनवणे यांनी 'गोधड' या काव्यसंग्रहाला कुसुमाग्रज काव्य पुरस्कार मिळाला आहे. कवी वाहरू सोनवणे यांचा आदिवासींच्या अस्तित्वासाठी आणि आत्मसन्मानासाठी 'आदिवासी एकता परिषद' या सामाजिक संघटनेच्याद्वारे तमाम आदिवासींना जोडण्याचा प्रयत्न आजही सुरूच आहे.

'गोधड' काव्यसंग्रहातील काही कवितांचा रसग्रहण खालील प्रमाणे केले आहे.

फाटकी फाटकी गोधड
फाटलेली
गोधडीतल्या गोधडीत
गुंडाळत राहिला
[illegible] नाक
गालावर करून
कूस बदलत राहिलो...

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 84 : बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी कविता
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

पूर्वज दु:खांची
आठव्या वारसदारांना
सांगी फाटकी गोधड
मळलेली!

'गोधड' म्हणजे वाकळ किंवा गोधडी. 'गोधड अनेक प्रकारची असू शकते - जरीकाठी, मुलायम, गुबगुबीत वगैरे. पण ही 'गोधडी' म्हणजे ती अनेक ठिकाणी फाटल्यामुळे, झालेल्या चिंध्या शरीराप्रमाणे लोंबत आहे. चिंध्याप्रमाणे आदिवासींची आज अवस्था झाली आहे. फाटलेल्यातून आतडे बाहेर आले आहे. अशी त्यांची अवस्था झाली आहे. ही गोधड पांघरली तर तिच्या फटक्यातून रात्री उघड्यावर झोपल्यावर चांदण्या दिसतो. जरीकाठी गोधडीतून चांदण्या दिसत नाही. पण आदिवासींच्या गोधडीतून चांदण्या दिसतो. आदिवासी हक्कासाठी लढायला संघर्ष संघटित झाले पाहिजे पूर्वज दु:खांची आठव्या वारसदारांना आठवण करून दिली पाहिजे. कवीनी आपले विचार 'स्टेज' या कवितातून व्यक्त केली आहे.

आम्ही स्टेजवर गेलोच नाही
आणि आम्हाला बोलावलंही नाही.
खोट्याच्या इशाऱ्यांनी..
आमची पायरी आम्हाला दाखवून दिली
आम्ही निघून गेलो.

या मारख्या कवितातून आदिवासी माणसाला कधी सन्मानाची भूमिका दिली नाही. आदिवासींचे दु:ख आदिवासींना माहू लागले. समाज निवडातील वास्तव दर्शन अशा कवितातून कवीने रेखाटलेले आहे.

आदिवासी समाज गेल्या वीस एकवीस वर्षात साहित्यामध्ये केवळ जागा होऊन उठला आहे. नवनिर्मितीच्या जाणीव आदिवासी तरुणामध्ये येऊ लागली आहे. एकलव्याच्या शिष्यत्वाप्रमाणे त्यांनी विद्या घ्यायला नकार दिला त्यांनाच खोटे-खोटे गुरू मानले ज्ञान त्यांच्याकडूनच मिळू शकते असा न्यूनगंड बाळगणे आणि गुरूंना अंगठ्याची दक्षिणा म्हणून कापून देणे अशा चुका पुन्हा करायच्या नाहीत याची जाणीव त्याच्या कवितासंग्रहातून मिळते.

आदिवासी हा या भूमीचा मूळ मालक आहे. जंगल व जमीन यावर त्यांचाच पहिला अधिकार असतांनाही आज त्यांच्याजवळ भात:चे अन्न खाण्यासाठी काहीच राहिले नाही. "फडकी" काव्यसंग्रह हा कवी- धर्मेंद्र पवार आदिवासींच्या कवितातून गरीबी जाणिव व्यक्त होताना दिसते. उदा.

"झाकलेल्या झोपडीत
चांदण फडफडलं
तीन दगडी चुलीला
अमाप हसू फुटलं."

जेव्हा कष्टाने कमवून आणलेलं तीन दगडाच्या चुलीवर भात किंवा भाजी उकळते तेव्हा भुकी असलेल्या लहान मुलांच्या चेहऱ्यावर आनंद दिसतो.

फडकींसाठी तीने
मायन्याळ हट्ट धरला
बाप म्हणाला
भात पिकू दे
नागली पिकू दे

कधी स्पर्श झाला ☐
कुणास ठाऊक काय घडलं
गाभाऱ्यातल्या अंधारात
कच्या कोऱ्या फडकीत
मढं सरणावर चढलं ☐

भात, नागली हे प्रमुख पिके पिकून तरी पुरेशाठी फडकी घेता अली नाही आणि शेवटी निधनानंतर मढं सरणावर ठेवल्यावरच तिला नवी फडकी मिळे - अशी आदिवासी महिलांची अवस्था आजही आहे. नाशिक जिल्ह्यातील आदिवासींच्या महिलांचा पेहराव इतर आदिवासी प्रमाणेच, परंतु खोचा या फडकी, गुडघ्यापर्यंत लुगडं, पोलका हा त्यांचा पेहराव आहे.

कवी- बाबुलाल गाडगे यांनी "धरण आणि मरण या कवितेमधून आदिवासींना राष्ट्रीय विकास प्रवाहात आणण्याच्या निमित्ताने भूमिहीन आणि बेघर होण्याची वेळ आदिवासींवर आली आहे. ते पुढील कवितेतून व्यक्त केले आहे.

"जेथे आदिवासी तेथेच धरण
तेथ आदिवासींचे मरण
जेथे आदिवासी तेथेच गाव
जेथे आदिवासी तेथे प्रकल्प
तेही त्यांना मारण्याचाच संकल्प"

आदिवासींच्या शेतजमीनी धरणात जातात. त्यांच्या जीवनावर पाणी सोडल्या जातात. त्यावर काम करणारे हे आदिवासीच आहेत. शहराच्या आणि इतर समाजाचा विकासाचा हेतू पूर्ण होतो परंतु आदिवासींचा मरण्याचा संकल्प होतो.

आदिवासी साहित्य हे आदिवासी समाजाच्या व्यापक परिवर्तनाच्या चळवळीतून निर्माण झाले आहे. विषम समाजव्यवस्थेने पुढे शतकानी असणाऱ्या आदिवासी समाजाला माणुसकीपासून व विकासापासून वंचीत ठेविले त्यांची दखल कोणी घेतली नाही. आज या विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात ही आदिवासी साहित्य दुर्लक्षित आहे असे वाटते. आदिवासी समाजाला आपला सदा "स्व" कळावा यासाठी वेळ आली दलित आणि आदिवासी समाज हे दोन्ही वंचित आहेत. परंतु दोघांची दुःखं वेगवेगळी आहेत. कारण आदिवासी हा प्राचीन काळापासून डोंगर-दऱ्यात आणि जंगलात राहणारी जमात आहे. तर दलित हा समाज शहरीभागात वस्ती जास्त प्रमाणात आहे. आपल्या १९४७ साली स्वातंत्र्य मिळाल्यानंतर दलित समाजाचा विकास हा झपाट्याने झाला. तर शिक्षणाची गंगा आणि आरक्षण सुविधा आदिवासी पर्यंत उशिरा येऊन पोचली. याचा परिणाम सांस्कृतिक पर्यावरणावर झाला. आज आदिवासी शिक्षण घेवू लागला आहे. त्यामुळे तो लिहू व बोलू लागला आहे.

संदर्भ ग्रंथ:

१. निवडक विनायक तुमराम, संपा डॉ. सुधाकर पंडितराव बोधीकर.
२. आदिवासी आयकॉन, तुकाराम रोंगटे.
३. गोधड, वाहरू सोनवणे.
४. फडकी, संजय पवार.
५. आदिवासी मराठी साहित्य स्वरूप आणि समस्या, डॉ. प्रमोद मुनघाटे.
६. आदिवासी कविता आकलन आणि मुल्यमापन, डॉ. सुभाष पुलावळे.